Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ९, अंक ११]   गुरुवार ते बुधवार, मार्च १६-२२, २०२३/फाल्गुन २५, शके १९४४-चैत्र १, शके १९४५   [पृष्ठे ४, किंमत :रुपये ११.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

भाग एक-अ-नागपूर विभागीय पुरवणी

(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ८४.

मुख्याधिकारी, नगर परिषद, यांजकडून

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३ (१) [कलम २१ (२) सह] नुसार बुटीबोरी नगर परिषद क्षेत्राची विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करणेबाबत.

सूचना

क्रमांक नपबु-सा.बां.-३५३-२०२३.—

शासनाचे नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. एमयुएन-२०१७-प्र.क्र.३५८-नवि-१८, दिनांक १८ एप्रिल २०१८ अन्वये बुटीबोरी नगर परिषद नव्याने अस्तित्वात आलेली आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २१ (२) अन्वये बुटीबोरी नगर परिषद क्षेत्राचा नियोजनबद्ध विकास होण्यासाठी त्या क्षेत्राची विकास योजना तयार करणे आवश्यक आहे.

सबब, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३ (१) [कलम २१ (२) सह] अन्वये बुटीबोरी नगर परिषदेने विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करण्यासाठी सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. ०८, दिनांक २८ फेब्रुवारी २०२३ अन्वये मान्यता दिली आहे. त्यानुसार सदरची सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २३ (२) नुसार बुटीबोरी नगर परिषदेच्या विकास योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्राची हद्द दर्शविणारा नकाशा बुटीबोरी नगर परिषदेच्या कार्यालयात, कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनासाठी ठेवण्यात आलेला आहे.

ज्या नागरिकांच्या याबाबत काही सूचना/ हरकती असतील त्यांनी ही सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध होईल त्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत मुख्याधिकारी, बुटीबोरी नगर परिषद यांचेकडे लेखी स्वरुपात द्याव्यात. विकास योजना तयार करतांना त्या सूचना / हरकतींचा योग्य तो विचार करण्यात येईल.

बुटीबोरी :
दिनांक १३ मार्च २०२३.

(अवाच्य),
मुख्याधिकारी,
नगर परिषद, बुटीबोरी.

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ८५

BY CHIEF OFFICER, MUNICIPAL COUNCIL

Declaration of Intention to prepare Development Plan of Butibori Municipal Council under Section 23*(1)* [read with section 21*(2)*] of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

NOTICE

No. MCB-PWD-353-2023.—

Government of Maharashtra in Urban Development Department, *vide* its Notification No. MUN-2017-C.R.-358-UD-18, dated 18th April 2018 constituted Butibori Municipal Council. It is necessary to prepare the Development Plan for the area of Butibori Municipal Council as per Section 21*(2)* of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 for planned Development of the said area.

Hence, the Butibori Municipal Council by its resolution No. 08, dated 28th February 2023 has given consent to declare its intention to prepare Development Plan, as per provision of Section 23*(1)* [read with Section 21*(2)*] of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. Accordingly, this notice is being published.

The plan showing boundary of the area included in Development Plan of Butibori Municipal Council is kept open for inspection by the public on office working days, during office hours at the office of the Municipal Council as required under Section 23*(2)* of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966.

Any suggestion / objection of the public in this regard, may be forwarded in writing to the Chief Officer, Butibori Municipal Council with in a period of 60(Sixty) days from the date of publication of this notice in *Maharashtra Government Gazette.* The suggestion/ objection shall be duly considered while preparing the Development Plan.

(Illegible),
Chief Officer,
Municipal Council, Butibori.

Butibori :
Dated the 13th March 2023.

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ८६.

मुख्याधिकारी, नगर परिषद, यांजकडून

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६(१) अन्वये नरखेड शहराच्या प्रारूप विकास योजनेचे (दुसरी सुधारित) प्रसिद्धीकरण.

शुद्धीपत्र

क्रमांक नपन-न.र.वि.-दु.सु.वि.यो.-कलम २६(१)-शुद्धीपत्र-४८४-२०२३.—

ज्याअर्थी, नरखेड नगरपरिषदेने (यापुढे " उक्त नियोजन प्राधिकरण " असे निर्देशिलेले) तिच्या अधिपत्याखाली क्षेत्राची (यापुढे " उक्त क्षेत्र " असे उल्लेखलेली), महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे " उक्त अधिनियम " असे निर्देशिलेले), चे कलम २३(१) व ३८ मधील तरतुदीनुसार प्रारूप विकास योजना, नरखेड (दुसरी सुधारित) (यापुढे " उक्त प्रारूप विकास योजना " असे उल्लेखलेली) तयार करण्याचा इरादा ठराव क्र. ०२, दिनांक १७ मार्च २०२१ अन्वये जाहीर करून त्याबाबतची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, नागपूर विभाग, पुरवणी भाग-एक-अ मध्ये दिनांक जुलै ८-१४, २०२१ ला पृष्ठ ४ वर प्रसिद्ध केली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरणाने उक्त अधिनियमाचे कलम २६(१) अन्वये पत्र क्र. न.प.न.-न.र.वि.-कलम २६(१) प्रसिद्धीकरण-१६४३ ची अधिसूचना दिनांक २१ सप्टेंबर २०२२ च्या आदेशानुसार महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-एक-अ, नागपूर विभागीय पुरवणी मध्ये दिनांक गुरुवार, सप्टेंबर २२, २०२२ रोजी अ.क्र. ५७१, पृष्ठ क्र. १ व २ वर प्रसिद्ध झालेली आहे.

उपरोक्त अधिसूचनेमध्ये सूचनेचा मसुदा कायम ठेवून यामध्ये कलम ३८ चा या शुद्धीपत्राद्वारे समावेश करण्यात येत आहे. करिता सर्व संबधितानी याबाबत नोंद घ्यावी.

निशिकांत गवई,
मुख्याधिकारी,
नगर परिषद, नरखेड.

नरखेड :
दिनांक १६ मार्च २०२३.

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ८७.

BY CHIEF OFFICER, MUNICIPAL COUNCIL

Publication of Draft Development Plan of Narkhed (2nd revision), under Section 26(*1*) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

CORRIGENDUM

No. MCN-T.P.D.-D.P.-C.U.-S-26(1)-484-2023.—

Whereas, the Narkhed Municipal Council, (hereinafter referred to as "the said Planning Authority") *vide* Resolution No. 2, dated 17th March 2021, had declared its intention to prepare a Draft Development Plan of Narkhed (2nd Revision) (hereinafter referred to as the "said Draft Development Plan") for the area under its jurisdiction, (hereinafter referred to as the "said area") as per the provision of section 23(*1*) and 38 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as the "said act") and notice to that effect is published in Maharashtra Government Gazette, Nagpur Division Supplement Part 1-A on July 8-14, 2021 on Page 4;

And Whereas, letter No. NPN-TPD-S-26(*1*)-Publication-1643-Dated 21st September 2022 the said Planning Authority published notice as per said Act under Section 26*(1)* in Maharashtra Government Gazette, Nagpur Division Supplement Part-1-A, Sr. No. 571, Page No. 2 & 3 on 22nd September 2022.

The said Notification is hereby modified by missing the Section 38 keeping all the content at said notification unchanged all the concerned may take note at this.

NISHIKANT GAWAI,
Chief Officer,
Municipal Council, Narkhed.

Narkhed :
Dated the 16th March 2023.

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ८८.

मुख्याधिकारी, नगर पंचायत, यांजकडून

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६(१) अन्वये गोरेगांव शहराच्या प्रारूप विकास योजनेचे प्रसिद्धीकरण.

सूचना

क्रमांक नपगो-कावि-बांध-२३६९-२०२३.—

ज्याअर्थी, गोरेगांव नगरपंचायतीने (यापुढे "उक्त नियोजन प्राधिकरण" असे निर्देशिलेले), तिच्या अधिपत्याखालील क्षेत्राची (यापुढे "उक्त क्षेत्र" असे उल्लेखलेली), महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे "उक्त अधिनियम" असे निर्देशिलेली), चे कलम २१(२) चे अनुषंगाने कलम २३(१) मधील तरतुदीनुसार प्रारुप विकास योजना (यापुढे "उक्त प्रारुप विकास योजना" असे उल्लेखलेली), तयार करण्याचा इरादा ठराव क्र. ०८, महाराष्ट्र शासन राजपत्र, नागपूर विभागीय पुरवणी, भाग-१-अ मध्ये दिनांक २८ ऑक्टोबर-०३ नोव्हेंबर २०२१ रोजी प्रसिद्ध केली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम २४ च्या तरतुदीस अनुसरून गोरेगांव नगरपंचायतीने उक्त क्षेत्रासाठी उक्त प्रारुप विकास योजना तयार करण्यासाठी सहायक संचालक, नगर रचना, गोंदिया शाखा, गोंदिया यांची "नगर रचना अधिकारी" म्हणून आदेश क्र. १९८, दिनांक १२ ऑगस्ट २०२२ अन्वये नेमणूक केली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार, नगर रचना अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगर रचना, गोंदिया शाखा, गोंदिया यांनी उक्त अधिनियमाचे कलम २५ अन्वये विद्यमान जमीन वापर नकाशा तयार केल्यानंतर, उक्त क्षेत्राची उक्त प्रारुप विकास योजना तयार करून ती उक्त नियोजन प्राधिकरणाकडे उक्त अधिनियमाचे कलम २६(१) अन्वये प्रसिद्ध करण्यासाठी हस्तांतरीत केली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरणाने उक्त अधिनियमाचे कलम २६(१) अन्वये उक्त प्रारुप विकास योजना जनतेकडून सूचना/हरकती मागविण्याकरीता प्रसिद्ध करण्यासाठी ठराव क्र. ०८, दिनांक २८ डिसेंबर २०२२ पारीत केलेला आहे.

त्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरण उक्त प्रारुप विकास योजना, विकास योजना अहवालासह उक्त अधिनियमाच्या कलम २६(१) अन्वये नागरिकांकडून सूचना/हरकती मागविण्याकरीता प्रसिद्ध करीत आहे. सदरहू योजनेसंबंधीचे नकाशे व अहवाल कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ, खाली नमूद केलेल्या कार्यालयात उपलब्ध आहेत.

(१) मुख्याधिकारी, गोरेगांव नगरपंचायत.

(२) सहायक संचालक, नगर रचना, गोंदिया शाखा, गोंदिया.

उक्त प्रारुप योजनेतील तरतुदीसंबंधी नागरिकांच्या काही सूचना/हरकती असतील तर त्यांनी ही सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत मुख्याधिकारी, गोरेगांव नगरपंचायत यांचेकडे लेखी स्वरूपात कारणांसह पाठवाव्यात. सदरची सूचना

महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत नगरपरिषद/नगरपंचायतीकडे प्राप्त झालेल्या सूचना/हरकती विचारात घेतल्या जातील.

उक्त प्रारुप विकास योजनेचे नकाशे व तपशीलाच्या प्रती योग्य शुल्क आकारून गोरेगांव नगर पंचायतीच्या कार्यालयात नागरिकांना उपलब्ध होऊ शकतील.

राहुल परीहार,

गोरेगांव : मुख्याधिकारी,

दिनांक १० मार्च २०२३. नगर पंचायत, गोरेगांव.

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ८९.

BY CHIEF OFFICER, NAGAR PANCHAYAT

Publication of Draft Development Plan of Goregaon Under Section 26*(1)* of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966.

NOTICE

No. NPG-WS-Const.-2369-2023.—

Whereas, the Goregaon Nagar Panchayat, (hereinafter referred to as the said "Planning Authority,") *vide* Resolution No. 01, dated 25th March 2021 had declared its intention to prepare a Draft Development Plan of Goregaon (hereinafter referred to as the "said Draft Development Plan") for the area under its jurisdiction, (hereinafter referred to as the said "area") as per the provision of Section 23(*1*) read with Section 21(*2*) of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as the "said Act" and notice to that effect is published in Maharashtra Government Gazette Nagpur Division, Supplement Part 1-A on 28th October-3rd November 2021.

And whereas, as per the provision in Section 24 of the said Act, the Nagar Panchayat *vide* Order No. 198, dated 12th August 2022 has appointed Assistant Director, Town Planning, Gondia Branch, Gondia as "Town Planning Officer" to prepare the said Draft Development Plan for the said area ;

And whereas, the Town Planning Officer and Assistant Director, Town Planning, Gondia Branch, Gondia after having prepared Existing Land Use Map as per Section 25 of the said Act, has Prepared the said Draft Development Plan of the said area and has handed it over to the said Planning Authority on 26th September 2022 for publication under Section 26(*1*) of the said Act;

And whereas, the said Planning Authority has passed Resolution dated 26th December 2022 to publish the said Draft Development Plan under Section 26*(1)* of the said Act, for inviting suggestions/ objections from the public;

Therefore, Goregaon Nagar Panchayat hereby publishes the said Draft Development Plan along with the Report uner Section 26*(1)* of the said Act for inviting suggestion/objections from the public. The copy of the said Draft Development Plan and Report thereof are kept open for inspection of the public at the following offices on all working days during office hours.

(1) The Chief Officer, Goregaon Nagar Panchayat.

(2) Assistant Director, Town Planning, Gondia Branch, Gondia.

The suggestions/objections if any, in writing from the public in this regard with reasons, shall be submitted to the Chief Officer, Goregaon Nagar Panchayat within the period of 30 days from the date of publication of the Notice in *Maharashtra Government Gazette*. Suggestions/objections received by the Nagar Panchayat within the period of the 30 days from the date of publication of this Notice in Maharashtra Government Gazette shall only be considered.

The copies of the said Draft Development Plan and particulars shall be available to the public at reasonable price in the office of the Goregaon Nagar Panchayat.

RAHUL PARIHAR,

Goregaon : Chief Officer,

Dated the 10th March 2023. Nagar Panchayat, Goregaon.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.